MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To March 2021
Issue 37, Vol-11

Date of Publication
01 March, 2021

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

PRINCIPAL
Sonopant Dandekar Arts College
V. S. Apte Commerce College &
M. H. Mehta Science College
Palghar (W.R.)
Dist. Palghar Pin 401 404

13) Women's Emancipation and Dr. Babasaheb Ambedkar
**Ms. Sarita Vishwanath Sthul & Dr. Pratibha Gutam Taksande, Wardha** ||70

14) Role of the INFLIBNET in the Development of University Libraries
**Dr. Sunil H. Urkudkar, Di-Wardha, Maharashtra** ||75

15) Impact of Covid-19 on Goods & Service Tax in India (Current financial ...
**Vikash Kumar Yadav, Gorakhpur(U.P.)** ||78

16) वाचन संस्कृती रुजवीण्यामध्ये महाविद्यालय ग्रंथालयाची भूमिका : एक अभ्यास
**श्री. अरविंद अंबादास भगत, जि. गोंदिया** ||82

17) ई—वर्तमानपत्र, ईमासिके व ई—संशोधनपत्रिका याची महाविद्यालय ग्रंथलयामध्ये ...
**सौ. प्रज्ञा अरविंद भगत, आमगाव** ||85

18) कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यी जीवनांत भ्रमणध्वनीचे फायदे आणि तोटे : ...
**प्रा. नलिनी गजभिये, वर्धा** ||88

19) अण्णा भाऊ साठे यांची कथा साहित्य
**प्रा.डॉ. नवीन केशवराव गिलबिले, औंढा नागनाथ** ||92

20) प्राचीन ग्रंथालये : विकास व कार्य
**प्रा.डॉ. शीला गोडबोले, पालघर** ||95

21) 'पेरा' या काव्यसंग्रहाचे वेगळेपण
**प्रा.डॉ.गजानन जाधव, जाफ्राबाद** ||98

22) कौटुंबिक हिंसाचार — स्त्रियांचा आर्थिक छळ, कारणे आणि उपाययोजना (विशेष ...
**डॉ. कुमुदिनी भा. जोगी, जि.अमरावती, महाराष्ट्र** ||102

23) या सत्तेत जीव रमत नाही आणि वर्तमान वास्तव
**प्रा.डॉ. संजय कसाब, जि.परभणी** ||105

24) शेतीक्षेत्रातील बेरोजगारी – एक अभ्यास
**डॉ. अनिल श्री. खांडेकर, अमरावती** ||108

25) प्राकृत भाषेतील आद्य अनुवादक : संत ज्ञानेश्वर व समकालीन भाषांतराचे स्वरूप
**डॉ.सुरेश शिंदे, जि.लातूर** ||110



www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

PRINCIPAL
Sonopant Dandekar Arts College
V. S. Apte Commerce College &
M. H. Mehta Science College
Palghar (W.R.)
Dist. Palghar. Pin 401 404

कथेत मांडले आहे. त्यांनी आपल्या कथेत कुठेही दैववादी, ईश्वरवादी विचारसरणीला थारा दिला नाही. कारण हा विचार दलितांना दुबळे बनवतो असे त्यांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी कष्टाला म्हणजेच श्रमाला महत्त्व दिले आहे सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे हा विचार त्यांनी या समाजाला दिला व याच दलित समाजाचे जीवन तितक्याच प्रामाणिकपणे त्यांनी आपल्या साहित्यात मांडले आहे.

अण्णा भाऊ साठे यांची कथाही अधिक सुंदर व दर्जेदार होण्याचे कारण म्हणजे त्याच्यात आलेली प्रतिमासृष्टी व भाषाशैली होय. ग्रामीण भागातील जीवन त्यांच्या कथेत आलेले असल्यामुळे तेथील पक्षी, नदी, नाले, शेती यासारख्या प्रतिमा त्यांच्या कथेला सुंदर बनवतात. तर त्यांच्या कथेत आलेल्या ग्रामीण भागातील माणसांच्या अभिव्यक्तीचे दर्शन त्यांनी वापरलेल्या प्रतिमां मुळे उठून दिसते. त्यात डोक्यावरील फेटा, फरशी कुऱ्हाड, रुंद छाती, पिळदार मिशा ह्या प्रतिमा ग्रामीण माणसाचे व्यक्तिमत्व खुलवणाऱ्या आहेत. प्रत्येक घटना प्रसंग वाचताना तो प्रसंग जणू काही आपल्या डोळ्यापुढे घडतो आहे असे वाचकाला वाटते त्यांच्या भाषाशैली मुळेच त्यांची कथा रसिकप्रिय झाली आहे.

संदर्भ:—

१) खरात प्रकाश, 'दलित कथा: उगम आणि विकास'. सुगावा प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्रमांक ५५
२) तत्रैव पृष्ठ क्रमांक ६६
३) तत्रैव पृष्ठ क्रमांक ५८

□□□

PRINCIPAL
Sonopant Dandekar Arts College
V. S. Apte Commerce College &
M. H. Mehta Science College
Palghar (W.R.)
Dist. Palghar. Pin 401 404

20

# प्राचीन ग्रंथालये : विकास व कार्य

**प्रा.डॉ. शीला गोडबोले**
ग्रंथपाल,
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर

**********

**प्रस्तावना :**

लेखनकलेचा उगम झाल्यानंतर त्याच काळात ग्रंथ लेखन व ग्रंथालयाच्या निर्मितीलाही चालना मिळाली. मानवाच्या देव, समाज, धर्म, धार्मिक परंपरा, समजूती, पौराणिक कथा व त्यांच्यातील अभिव्यक्त होणाऱ्या प्रेरणा व शब्दरूपाने अभिव्यक्त होणाऱ्या भावना व विचार ही ग्रंथनिर्मिती मागची किंवा ग्रंथ लेखनामागची प्रेरणा आहे. मानवी उत्क्रांतीच्या विकसनशील टप्प्यांवर विविध संस्कृतीच्या विविध कालखंडामध्ये ग्रंथ व ग्रंथालये विकसित होत गेली आहेत. ज्या देशात पहिल्यांदाच ग्रंथालय निर्माण झाले त्याचा मुख्य उपयोग जरी मर्यादित लोकांसाठी, मर्यादित भागाकरीता, मर्यादित उद्देशाकरीता होता तरी त्या ग्रंथालयांनी मध्ययुगीन व आधुनिक ग्रंथालयाच्या विकासासाठी खुपच उपयुक्त ठरली आहेत. प्राचीन ग्रंथालये विकसित होत असतांना पुढील काळासाठी अप्रत्यक्षपणे आधुनिक ग्रंथालयांना केले आहे.

**प्राचीन ग्रंथालये :**

ग्रंथाच्या लेखन विकासाबरोबरच ग्रंथालये निर्मितीला प्राचीन काळापासूनच गति मिळाली आहे संस्कशति व मानवी विकसनाबरोबरच ग्रंथालये विकसित होत गेली आहेत. ग्रंथनिर्मितीला चालना मिळून ग्रंथालयाच्या निर्मितीला गती देण्यासाठी त्या त्या काळातील, लेखक, पुजारी व राजे सम्राट यांनी महत्त्वाची भुमिका केली आहे. जागतिक ग्रंथ व ग्रंथालये निर्मितीच्या दृष्टीने सुमेरियन, बॅबिलानियन व असीरीयन या संस्कृती खुपच उपयुक्त मानल्या जातात. या संस्कृती ज्या

मानवी प्रदेशात घडून आल्या त्या समाजात सर्वप्रथम विद्येला प्राधान्य दिले गेले, महत्त्व दिले गेले. ग्रंथ व ग्रंथालये निर्माण होण्याची प्रक्रिया गतिमान असतांनाही हे लेखन व ग्रंथ निर्मिती मात्र प्रस्थापित वर्गाकडे होती नाहीतर 'पुजारी' वर्गाच्या हातात होती.

सुरूवातीच्या काळात लेखन माध्यमांचा विकास संथ गतीने झाला. त्यासाठी 'विट' हे लेखनाचे माध्यम होते. पौराणिक कथा, दैत्य व देवासंबंधीच्या सर्व मानवी कल्पना व सामाजिक नियमांचे नैतिक, धार्मिक नियम हे विटांवरच लिहिले जात व ज्या ठिकाणी या 'विटा' ठेवल्या जात त्यालाच लिहिलेल्या विटांचे घर म्हणजेच, आजचे ग्रंथालय व ग्रंथ त्या ग्रंथरूपी विटांचे रक्षण करणारा त्याला वर्गीकश्त करून व्यवस्थित सांभाळणारा 'लिहिलेल्या विटांचा अधिपती' म्हणजेच आजचा ग्रंथपाल समजले जाई.

हम्मुराबी या राजाने विटा व दगडांवर २८२ नियम व कायदे लिहून ठेवले आहेत. व ते ग्रंथालयात व्यवस्थित ठेवण्यात आले होते. त्याच नियमरूपी ग्रंथांना हम्मुराबीचे कोड (Hammurabis Code) म्हटले गेले आहे. (Baby Lonian dynesy) – 1984 to 1595 B. B. (आजचा इराक देश)

असुरबनिपाल (Assurbanipal King) या असिरियन खिस्तपूर्व सातव्या शतकातील राजाने त्या प्रदेशातील ग्रंथालय व ग्रंथ निर्मितीला प्रचंड गती दिली. शिक्षण व साहित्य, कला, विज्ञान, धर्म, याबाबतीत अनेक ग्रंथांचे त्याने त्यांच्या वैयक्तिक ग्रंथालयात जतन केले. भाषा कोष, व्याकरणावरील ग्रंथ या सर्व ग्रंथांची सुची करून एका अर्थाने सुची निर्मितीचा पाया घातला ग्रंथालय शिस्तबद्ध रूपाने चालविण्यासाठी संचलनासाठी असुरबनिपाल याने अनेक लोकांना देशोदेशी पाठवून मुळग्रंथ किंवा त्यांच्या नकला मिळविण्यासाठी प्रयत्न केला. अनेक देशातील अत्यंत प्राचीन, दुर्मिळात दुर्मिळ होत जाणाऱ्या तत्त्वज्ञान व माहितीला संकलित करून विटांवर लिहून घेणे व त्यांचे सुचीबद्ध वर्गीकरण करून त्यांचे संवर्धन व जतन करणे ही महत्त्वाची कार्य असुरबनिपाल यांनी केली. विटांवर सर्व ग्रंथालयीन सोपस्कार करून ती व्यवस्थित ग्रंथालयात जपवणूक होत आहे की नाही हे स्वतः तो बघत असे.

असे विविध लेखन साहित्याने युक्त ग्रंथालय तसेच सर्वासाठी खुले असणारे जगातील पहीलेच मुक्तद्वार ग्रंथालय असलेच पाहीजे. असुरबनिपाल याने ग्रंथ व ग्रंथालयाच्या विकासात अत्यंत महत्त्वाची भुमिका बजावली आहे. त्याच्या प्रगत व दुरदश्ष्टीमुळे जगातील अनेक भागातील पुढील काळातील ग्रंथालयाच्या विकासाला व वाचन चळवळीला प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे खुप मदत झाली आहे. निनेव्ह (Nineveh) शहरातील त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ उभी असलेली The Royal Library of Asshurbanipal हे आजही खुपच समृद्ध ग्रंथालय आहे व त्याच्या भरीव कार्याची साक्ष देत आहे.

प्राचीन इजिप्त देशातील पॅपिरसवा लिहिलेली पुस्तके देखील प्राचीन ग्रंथ आहेत. कथ, नाटके, आर्थिक,सामाजिक, वैज्ञानिक, देव, धर्म, मानवी आरोग्य, पशुपक्षी, प्राणी व त्यासंबंधीच्या गोष्टी, यासंबंधीचे वाचनसाहित्य प्राचीन इजिप्त मध्ये लिहिले गेले वाचले गेले. त्यामुळे तेथील ग्रंथालये वैविध्यपूर्ण वाचन साहित्याने समृद्ध आहेत. इजिप्सीयन लोकांचा सार्वात प्राचीन समजला जाणारा मृतांचे पुस्तक (Egyptian Book of the Dead) अनेक प्रतिसाद विविध पिरॅमिडस मध्ये आढळून येते.

प्राचीन ग्रंथ व ग्रंथालयाच्या विकासामध्ये अत्यंत महत्त्वाची भुमिका निभावली आहे ती टॉलेमी या ग्रीक राजाने. त्याने उभारलेले अलेक्झांड्रिया म्युझियम या नावाने ते साऱ्या जगाला परीचित आहे. टॉलेमीच्या नंतरही येणाऱ्या राजांनी ग्रंथालय क्षेत्रात भरीव कामगिरी केली मात्र ज्याप्रमाणे नालंदा विद्यापिठ व ग्रंथलयाचा आक्रमकांनी विध्वंस केला त्याप्रमाणे अलेंक्झांड्रिया म्युझियमही अनेक आक्रमकांच्या हल्ल्यात नष्ट झाले.

**मध्ययुगीन ग्रंथालये:**

मध्ययुगात बगदाद, दमास्कस व कैरो ही एकप्रकारे ज्ञानकेंद्रेच होती. या शहरांमध्ये अरबांनी मोठमोठी ग्रंथालये उभी केली वाचनसाहीत्य जतन करण्यासाठी खऱ्या जाते. जगातल्या विविध भागातील संस्कृति व विषय—उपविषयावरील अनेक ग्रंथ अरबांनी मोठमोठ्या ग्रंथालयात जतन करून ठेवले. स्पेन देशाचे ग्रंथ कार्डोव्हा येथील बादशाही ग्रंथालय हे त्याचे ज्वलंत

उदाहरण आहे. या ग्रंथालयाच्या वाचकांना ग्रंथासोबतच टिपणे काढण्यासाठी शाई, कागद व लेखणी देखील पुरवली जात असे. अरब लोकं ज्ञानी व लेखक विद्वानांचा प्रचंड आदर करत असत. त्यांच्या या प्रवृत्तीमुळेच चीनी लोकांपासून कागद बनविण्याची कला शिकून त्या कलेचा प्रसारही जगभर अरबांनी केल्याचे दाखले आहेत.

इ. स. ८ व्या शतकानंतर खऱ्या अर्थानक मध्ययुगीन ग्रंथालये वाचनसाहित्याने प्रचूर होत गेले. मोठ्य प्रमाणावर ग्रंथ लिहिल्या जावू लागले. प्राचीन ग्रंथाचे समिक्षात्मक ग्रंथ निर्माण होवू लागले. व अनेक ग्रंथाची चिकित्सा मिमांसा करणारे लेखक तयार झाले. अरब खलिफांच नेतृत्वाचाली ग्रीक, फारसी व संस्कृत ग्रंथांची मोठ्या प्रमाणावर अरबी भाषेत भाषांतरे करून घेमली गेली. त्यांच्या शिक्षण, वाचन व ग्रंथालय क्षेत्रातील आवड व कार्यामुळे मोठ मोठी जगप्रसिद्ध विद्यापिठे ग्रंथालये स्थापन झाली व त्या विद्यापिठांमधून ॲरिस्टॉटल, प्लेटो, सॉक्रेटिस हे ग्रीक तत्त्ववेत्ते जगाला परिचित झाले.

मध्ययुगील अरब जगतात चार प्रकारची ग्रंथालये स्थापली गेली. बादशाही ग्रंथालये, मशिदीशी संलग्न ग्रंथालये, विद्यापिठ ग्रंथालये आणि खासगी मालकी ग्रंथालये.

प्राचीन भारतीय क्षेत्रात अतिशय महवाचे योगदान ज्यांचे आहे ते म्हणजे खलिफा हारून—अल—रशिद (इ. स.७८६ — ८०९) यांनी बैतुल हिकमत म्हणजेच 'ज्ञानमंदिर' स्थापन केले. या ज्ञानरूपी ग्रंथालयात विविध भाषेवरील १० लाख ग्रंथ होते. ग्रंथालयाला जोडूनच 'भाषातंर विभाग' जोडलेला होता. व भाषातंर करून ग्रंथसाठा वाढविला जात असे.

ग्रंथालयाला जोडून भाषांतर विभाग निर्माण करून ग्रंथवाढ करणे हे कार्य तेथूनच सुरू झाले. ग्रंथालयाला ग्रंथलयाची आवड असणारा ग्रंथपाल असे व त्याच्या मदतीला सुद्धा अनेक मदतनीस असत. अनेक प्राचीन व विविध भाषातील ग्रंथाच्या नकला (Copy) करण्यासाठी अनेक लोक काम करत असत. व नवनिर्मिती ग्रंथाची टिकाऊ बांधणी करण्यासाठी 'जिल्दसाज' म्हणजेच आजचे बुक बाईंडर्स असत. हारून—अल—रशिद हा स्वत: या सर्वकामाकडे जातीने लक्ष देत असे. याशिवाय त्याने अनेक देशात माणसे पाठवून अनेक दुर्मिळ ग्रंथ जमा केले. त्यांच्या प्रति तयार केल्या, त्या ग्रंथाची भाषांतरे केली. त्याचा मुलगा देखील प्रचंड ग्रंथप्रेमी होता.

याशिवाय कैरो येथील अजिबबिल्ला या राजाने इ. स. ९५० मध्ये स्थापन केलेले 'खजायनल कुसूर' नावाचे खूप मोठे ग्रंथालय होते. या ग्रंथालयात सोळा लाख ग्रंथ होते.

इराण, इराक, इजिप्त, स्पेन या देशामध्ये प्राचीन काळात अनेक ग्रंथप्रेमी राजांनी ग्रंथालये स्थापन केली व ती लोकांसाठी खुली केली मात्र काळाच्या ओघात अनेक आक्रमकांनी ग्रंथालये नष्टही केली. ग्रंथपालाला मोठा मान सन्मान दिला जात असे त्याला वडील संबोधले जाई.

शिराजचा अबुलफजल, सिरियाचा बनु अमार, बादशहा नूर बिन मन्सूर, स्पेनचा अलहकीम, सुलतान जलालुद्दीन खिलजी या सवू लोकांनी ग्रंथालयाचा व विद्येचा विकास केला मात्र अरबांनी वाढविलेले हे ग्रंथालय रूपी वैभव टोळ्यांनी निर्दयीपणे नष्ट केले जेव्हा कार्दोषा शहराची लुट रानटी टोळ्यांनी केली तेव्हा त्यांनी ग्रंथालयातील ग्रंथांच्या जाड पुठ्ठ्यांचे जोडे बनविले व इतर ग्रंथ जाळून टाकले.

प्राचीन भारतीयांचा दैदिप्यमान ग्रंथालय व विद्येचा ठेवा म्हणजे 'नालंदा' होय. नालंदा विद्यापिठाची स्थापना व निर्मिती गुप्त घराण्याचा कुमारगुप्त या राजाने केली. ते बौद्ध धर्म उपासक होते. या विद्यापिठाचे ग्रंथालय इतके समश्द्ध होते की येथे ग्रंथालयाच्या तीन इमारती होत्या, रत्नसागर, रत्नरंजक व रत्नोदधि अशी ग्रंथानय इमारतींना नावे देण्यात आली होती. तत्त्वज्ञान, विज्ञान, गणित, तर्कशास्त्र, नितीशास्त्र, न्यायशास्त्र, वैद्यकशास्त्र, खगोलशास्त्र, धर्मशास्त्र अशा विविध विषयावरील ग्रंथ या ग्रंथालयामध्ये होते.

८ व्या शतकातील धर्मपाल राजाने बिहारमधील विक्रमशीला विद्यापिठाचे ग्रंथालय अनेक ग्रंथांनी समृद्ध होते. मात्र १२०३ च्या सुमारास विदेशी आक्रमकांनी या विद्यापिठ व ग्रंथालयाचा जाळून हा अमुल्य ठेवा नष्ट केला.

संदर्भ :

1- Beven, E. R. A. History of Egypt Under the ptolemic (Ptolemic Dynesty, Landon. 1927

2- Mahffy, J. P. The Empira of the Ptolemics 1895

3- Historyinindia.com

4- www.ancient.eu

5- ग्रंथसुची शास्त्र — ना. बा. मराठे (प्रकाशक — महाराष्ट राज्य ग्रंथालय संघ)

६. मराठी ग्रंथसुची १८०० — १९५०, २ खंड ले. दाते, शंकर गणेश.

7- Akheminian Inscriptions – Sen Sukumar, (ed)

❑❑❑

**21**

# 'पेरा' या काव्यसंग्रहाचे वेगळेपण

**प्रा.डॉ.गजानन जाधव**
सहा. प्राध्यापक,
सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफ्राबाद

**********

'पेरा' हा भालेरावांचा एक महत्त्वाचा संग्रह आहे. त्यात एकशे चौदा कवितांचा समावेश आहे. या संग्रहातील आशयविश्व संपूर्णपणे ग्रामीण जीवनाशी निगडित आहे. 'पेरा'मधील कवितांमधून मराठवाड्यातील ग्रामजीवनाचे प्रतिबिंब स्पष्टपणे उमटलेले आहे. शेतकरी परिवारातील त्याची सुखदु:खे- आशा आकांक्षा या संग्रहातून ठळकपणे प्रकटतात. त्याचप्रमाणे मानवी मनाच्या विविध भावछटाही साकार होतात. शेती, जमीन, पाऊस, पिके, बोरीबाभळी, पांदी, पायवाट इत्यादी संदर्भांनी युक्त ग्रामीण जीवन या संग्रहातील अनुभवविश्वात सामील असल्याचे जाणवते. ह्या साऱ्यांना वेढून असणारे निसर्ग सौंदर्य कवीने टिपले आहे. त्यातून ग्रामीण जीवनातील श्रध्दाळू मनाचे तरंग, खेडुतांचे हळवे अंतरंग, कोवळिक, हळुवारपण तसेच तीव्र रागलोभ-वासना-विकारही व्यक्त झाल्याचे जाणवते. असे असले तरी 'पेरा' या संग्रहातून शेतकऱ्यांच्या समस्या, अडीअडचणी, व्यथावेदनांही अधिक प्रकर्षाने, तीव्रपणे व्यक्त झाल्याचेही आढळून येते. एकूण 'पेरा' हा ग्रामीण कवितेचा एक मानदंड असल्याचे जाणवते. कवीने वैयक्तिक जीवनातील अनुभव जरी या संग्रहात मांडले असले तरी ते प्रातिनिधिक स्वरूपाचेही आहेत.

भारतीय खेड्यांमध्ये कष्टआणि दारिद्र्याचे पीक नेहमीच भरघोस येते. इतके की, त्यामुळे राब-राब राबणाऱ्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा ह्या गरजांही पूर्ण होत नाही. त्यामुळे उपासमार, अभावग्रस्तता अटळ असते. आपल्या बालपणातील दारिद्र्याचे चटके आपण कसे सहन केले हे सांगताना भालेराव म्हणतात-

"अरे आपलं बालपन काय बालपन होतं?
ते तर मुल्खाचं बकालपन होतं